# 11. औषधी वनस्पती ओळख व संवर्धन

उद्देश –

- आपल्या परीसरातील औषधी वनस्पती ओळखणे.
- त्यांचे औषधी उपयोग जाणून घेणे.
- त्या वनस्पतींच्या संवर्धनाच्या विविध पध्दतींची माहिती करुन घेणे.

कालावधी – 2 महिने ( आठवडयातील दोन दिवस, प्रत्येकी 2 तास )

जून, ऑक्टोबर, जानेवारी व मे या चार महिन्यात बाहेर येणा–या औषधी वनस्पतींचा अभ्यास करण्यासाठी अभ्यास सहली आयोजित करणे आवश्यक.

प्रशिक्षण शुल्क – प्रती विद्यार्थी रु.150/–

( अभ्यास सहली आयोजित करण्यासाठी विद्यार्थ्यांकडून स्वतंत्र शुल्क आकारावे )

आवश्यक मूलभूत सुविधा –

1. सर्व सुविधांसह क्लासरुम
2. वनस्पतीशास्त्र प्रयोगशाळा
3. औषधी वनस्पती बाग अगर रोपवाटीका

संस्थेकडे स्वत:ची औषधी वनस्पती बाग अगर रोपवाटीका उलब्ध नसल्यास गावातील अन्य संस्थांचे सहकार्य घ्यावे.

प्रशिक्षक –

1. एम.एस.सी.बॉटनी ( टेक्सॉनॉमी तज्ज्ञ )
2. आयुर्वेदिक वैद्यकीय व्यावसायिक ( M.D.द्रव्यगुण )

अभ्यासक्रम –

**A) औषधी वनस्पतींचा शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास ( Botanical aspects)**

| | व्याख्यानांची संख्या |
|---|---|
| • औषधी वनस्पती व त्यांचे महत्व | 02 |
| • विविध वनस्पतींसाठी शास्त्रीय संज्ञा व त्यांच्या बाहय रचनेचा अभ्यास | 10 |
| • औषधी व सुगंधी वनस्पतींची ओळख, त्यातील उपयुक्त भाग (Plant parts-झाडाचे मूळ, खोड,पाने, फुले, परागकण इत्यादी ) त्यांची वैशिष्टये, उपयोग व ओळखण्याच्या पध्दती | 05 |
| • ऋतुनुसार वनस्पतीतील औषधी भाग गोळा करण्याच्या पध्दती व वेळा | 03 |
| • आयुर्वेदिय औषधांसाठी वापरात येणा–या वनस्पतीतील भेसळ वनस्पती व त्या ओळखण्याच्या पध्दती | 01 |

**B) औषधी व सुगंधी वनस्पतींच्या संवर्धनाच्या पध्दती**

- दुर्मिळ व अती वापरामुळे नष्ट होत चाललेल्या वनस्पतींचा अभ्यास 02
- औषधी व सुगंधी वनस्पतींच्या संवर्धनाच्या विविध पध्दती

1. लागवड – वनस्पती लागवडीच्या पध्दती, रोपवाटिका तंत्रे, खतांचा वापर, पाणी, तण व रोग व्यवस्थापन 10
2. हर्बेरिअम टेक्निक्स
3. सीड बॅन्क 02
4. जीन बॅन्क 04
5. टिश्यू कल्चर इत्यादी 02

02

प्रात्यक्षिके –

1. औषधी व सुगंधी वनस्पतींचा अभ्यास करण्यासाठी चार अभ्यास सहलींचे आयोजन
2. वनस्पतींच्या बाहय रचनेचा अभ्यास– मूळ, खोड,पाने, फुले व बिया इत्यादी
3. बॉटॅनिकल की वापरुन औषधी व सुगंधी वनस्पती ओळखण्याच्या पध्दती.
4. रोपवाटिका तंत्रे व वनस्पती लागवड व संवर्धनाच्या पध्दती.
5. औषधी वनस्पती संवर्धन व माहिती संकलन.
6. पारंपारिक औषधी वनस्पतींचा अभ्यास व ओळख – (Identification of Folk Medicine)

**संदर्भ पुस्तके –**


औषधी संग्रह – श्री वामन गणेश देसाई

महाराष्ट्रातील दिव्य वनस्पती– सावंत, कॉन्टीनेन्टल प्रकाशन

द्रव्य गुण विज्ञान – बाडस शास्त्री

द्रव्य गुण विज्ञान– जवळगेकर–देशपांडे

औषधी बाण – पदे शास्त्री

औषधी व सुगंधी वनस्पती लागवड– प्रा.एस.के.पाटील

औषधी वनस्पती ओळखण्याच्या पध्दती ( मराठी की ) – मेहता पब्लिकेशन, कोल्हापूर.

Jain, S. K. 1986, A manual of Ethno botany Publisher Jodhpur